महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क्रमांकः नाविमं/पमा/ 1638
नागपूर, दिनांक – ०३/०६/२०२४

प्रति,

मा. संचालक,
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
नागपूर विभाग, नागपूर

विषयः– जुलै/ऑगस्ट 2024 च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) पुरवणी परीक्षा वेळापत्रकाबाबत.

संदर्भः– राज्य मंडळाचे पत्र व प्रकटन क. रा.मं./परीक्षा–६/२१२७, दि.–३१/०५/२०२४.

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, मंडळामार्फत घेण्यात येणा–या जुलै/ऑगस्ट 2024 च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) पुरवणी परीक्षेच्या वेळापत्रकांबाबतचे प्रकटन सोबत जोडलेले आहे.

तरी सदर प्रकटनास आपण आपल्या कार्यकक्षेतील सर्व वृत्तपत्रातून तात्काळ, विनामुल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी ही विनंती.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

सहपत्रः–प्रकटनाची प्रत

1) प्रति, सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर,पुणे–4 यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2) प्रति, शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांना समादराने अग्रेषित.
3) प्रति, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील माध्यमिक शाळा यांच्या लेखी निदर्शनास आणून दयावे.
4) प्रति, मा. संचालक, आकाशवाणी केंद्र नागपूर, यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या आकाशवाणी केंद्रावरुन बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
5) प्रति, मा. संचालक, दूरदर्शन केंद्र नागपूर, यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या दूरदर्शन केंद्रावरुन बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
6) मा. संपादक, दै.............................................................यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या वृत्तपत्रातून तात्काळ विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
7) मुख्याध्यापक/प्राचार्य, सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, नागपूर विभाग, नागपूर यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनानुसार कार्यवाही करावी.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४

विषय– जुलै–ऑगस्ट २०२४ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) पुरवणी परीक्षा वेळापत्रकाबाबत

## प्र क ट न

जुलै–ऑगस्ट २०२४ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छ.संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) पुरवणी परीक्षेची लेखी परीक्षा खालील कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | तपशील | लेखी परीक्षा कालावधी |
|---|---|---|
| १. | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी)<br>सर्वसाधारण व व्दिलक्षी विषय व ऑनलाईन परीक्षा | मंगळवार, दि. १६ जुलै, २०२४ ते<br>गुरूवार, दि. ०८ ऑगस्ट, २०२४ |
| २. | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी)<br>व्यवसाय अभ्यासक्रम | मंगळवार, दि. १६ जुलै, २०२४ ते<br>शनिवार, दि. ०३ ऑगस्ट, २०२४ |
| ३. | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १०वी) | मंगळवार, दि. १६ जुलै, २०२४ ते<br>मंगळवार, दि. ३० जुलै, २०२४ |

इ. १० वी प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा मंगळवार, दि. १६ जुलै, २०२४ ते मंगळवार, दि. ३० जुलै, २०२४ व इ. १२ वी प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा मंगळवार, दि. १६ जुलै, २०२४ ते शनिवार, दि. ०३ ऑगस्ट, २०२४ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे.

तसेच इ.१२वी माहिती तंत्रज्ञान, सामान्यज्ञान विषयाची परीक्षा ऑनलाईन पध्दतीने दि. ०७.०८.२०२४ व दि. ०८.०८.२०२४ रोजी घेण्यात येणार आहे

उपरोक्त कालावधीमध्ये आयोजित केलेले दिनांकनिहाय सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या अधिकृत **www.mahahsscboard.in** संकेतस्थळावर सोमवार, दि. ०३.०६.२०२४ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे.

मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे छापील स्वरूपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरून परीक्षेच्या तारखांची खात्री करून घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ट व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हॉट्सॲप किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये.

उपरोक्त बाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : - ३१.०५.२०२४

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ४.